October - 2020

(7)

10रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE INDIA दस रुपये TEN RUPEES 23 OCT 2020

जोडपत्र "अ"

(नियम ३ पहा)

माहितीचा अधिकार, नियम २००५ अन्वये

माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

प्रति,

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 07 : मा : अ:
दिनांक 23/10/2020

**जन माहिती अधिकारी सा.**

विधी विभाग,

मीरा-भाईंदर महानगर पालिका, भाईंदर (पश्चिम)

**१) अर्जदाराचे पूर्ण नांव :-** अरूणकुमार चौबे

**२) पत्ता :** सी/४२, शांती शॉपिंग सेंटर, मीरारोड स्टेशन,

मिरारोड (पु.) मो. ८०८२२२७८६१

**३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :** मीरा-भाईंदर महानगरपालिका कार्यरत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील शहर अभियंता श्री शिवाजी बारकुंड व कार्यकारी अभियंता श्री दीपक खांबित यांच्यावर माननीय न्यायालयात चालू केस बाबत माहिती.

**(एक) माहिती संबंधीत कालावधी :-** वर्ष २००२ पासून आतापर्यंत.

**(दोन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :** - खालील प्रमाणे

(१) सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या शहर अभियंता माननीय श्री शिवाजी बारकुंड ~~यांच्यावर कोणकोणत्या केस कोणकोणत्या न्यायालयात चालू आहे त्याची~~ यांनी मा. उच्च न्यायालयात केस क्रमांक, तारीखची माहिती व सध्या त्याची स्थिती याची माहिती देण्यात यावे.

2)सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता श्री दीपक खांबित यांच्यावर कोणकोणत्या कोर्टात केस चालू आहे आणि ते कोणकोणत्या कोर्टात चालू आहे त्यांची सध्याची आणि केस क्रमांक व सध्या तारीख व स्थितीत देण्यात यावे.

**(४) माहिती टपालाद्वारे किवां व्यक्तिगत :** - व्यक्तिगत

**(५) अर्जदार दारिद्य रेषेखालील आहे किंवा नाही :** - नाही

ठिकाण : मिरा रोड (पु.)

दिनांक : २३/१०/२०२०

Received on 23/10/2020

सही/-

**श्री. अरुण कुमार चौबे**

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०७/२०२०-२१
दि. १२/११/२०२०

प्रति,

श्री. अरुणकुमार चौबे
सी/४२, शांती शॉपिंग सेंटर, मिरारोड स्टेशन,
मिरारोड (पु)

**विषय** :- केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.

**संदर्भ** :- आपला दि. २३/१०/२०२० रोजीचा अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये आपण मुद्दा क्र. १ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सार्वजनिक बांधकाम विभागातील शहर अभियंता श्री. शिवाजी बारकुंड यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेचा क्रमांक, तारीख व सद्यस्थितीची माहिती तसेच मुद्दा क्र. २ नुसार कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबीत यांच्यावर कोणकोणत्या कोर्टात केस चालू आहे त्याची केस क्रमांक, तारीख व सद्यस्थितीची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करून देत आहे.

**मुद्दा क्र. १** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. शिवाजी बारकुंड यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे संदर्भिय याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये याचिकेदार यांचे असे म्हणणे आहे कि, "मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. शिवाजी बारकुंड हे शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याने त्यांस सदर पदावर कायम करणेबाबतचा प्रस्ताव फेटाळणेबाबतचे मा. शासनाचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे पत्र रद्द करुन त्यांस मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शहर अभियंता या पदावरुन पदावनत करु नये." सदर याचिकेमध्ये मा. शासनास प्रतिवादी क्र. १ तसेच महानगरपालिकेस प्रतिवादी क्र. २ करण्यात आले आहे. सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि. ३/७/२०१५ रोजी जैसे थे आदेश दिलेले असून सदरचे आदेश वेळोवेळी वाढवून दिलेले आहेत. सदरची रिट याचिका Pre-Admission साठी असल्याचे मा. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर दिसून येत आहे. सदर होमपेजची प्रत देत आहे

**मुद्दा क्र. २** :- सदर मुद्यांची माहिती निरंक आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. अजित मुठे, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका